# दैनिक विवेक सिंधु

बीड जिल्हा | बुधवार, दि.04 फेब्रुवारी 2026 | viveksindhu@gmail.com | वर्ष 45 वे | अंक क्र.261 | पाने 4 | किंमत : 2 रु. | www. viveksindhu.com


## बेपत्ता तरूणाचा विहिरीत आढळला मृतदेह



गेवराई – तालुक्यातील तलवाडा येथील अंबिका नगर येथील रहिवासी असलेला रामेश्वर मोहन शिंगणे काही (वय २५) कारणास्तव रागाच्या भरात दि.३१ जानेवारी २०२६ रोजी संध्याकाळी आपल्या आईला सांगून तो बाहेर निघून गेला होता. मात्र घरी न परतल्याने त्याची सर्वत्र शोधा–शोध घेतली परंतू तो सापडला नाही. अखेर आज रामेश्वर शिंगणे याचा मृतदेह अंबिका नगर भागातील विहिरीत आढळला.

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील रामेश्वर शिंगणे हा शनिवार (दि.३१) जानेवारीपासून बेपत्ता होता. या प्रकरणात काल तलवाडा पोलिस ठाण्यात आईच्या तक्रारीवरून तो बेपत्ता असल्याची नोंद घेण्यात आली होती. आज अंबिका नगर भागातीले विहिरीत रामेश्वर (उर्फ गोरख) शिंगणे याचे प्रेत नागरिकांना आढळून आले. याप्रकरणी तलवाडा पोलीस स्टेशनचे सपोनि मनोज निलगेकर यांना माहिती मिळताच उपनिरीक्षक कैलास अन्नादास, बीट अंमलदार अंजन गडदे, पोह नारायण काकडे घटनास्थळी दाखल झाले होते. पाण्यामुळे रामेश्वरचा मृतदेह पुर्णपणे छिन्न–विच्छिन्न झाला होता. त्यामुळे जागीच शवविच्छेदन करण्यात आले असून पुढील तपास सुरु आहे.

## शेतातील तार कंपाउंडमुळे युवकाचा गेला जीव



गेवराई – तालुक्यातील राजापुर येथील शेतकऱ्याने शेतातील भुईमुगाचे वन्य प्राण्यांकडून नुकसान होऊ नये म्हणून तारेच्या कंपाऊंडमध्ये वीज प्रवाह सोडला. सदरील ठिकाणी चित्रे पकडण्यासाठी एक तरूण आला असता. त्याचा या कंपाऊंडला चिटकून मृत्यु झाल्याची घटना रविवार (दि.२५) रोजी घडली असून शेतकऱ्या विरोधात तलवाडा पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे.

राजापुर येथील लक्ष्मण गोविंद जाधव यांनी आपल्या शेतामध्ये भुईमुगाची लागवड केली होती. भुईमुगाचे वन्य प्राण्यांनी नुकसान करू नये म्हणुन भुईमुगा भोवती असलेल्या कंपाऊंडमध्ये वीज प्रवाह सोडला. सदरील ठिकाणी योगेश उत्तम कचरे (वय २२) रा.भोगगाव ता.घनसांगवी जि.जालना हा तरूण चित्रे पकडण्यासाठी आला होता. त्याला तारेच्या कंपाऊंडला विद्युत पुरवठा असल्याचे माहित नसल्याने त्याला वीजेचा शॉक लागून त्याचा मृत्यु झाला.या प्रकरणी तलवाडा पोलीस ठाण्यात सोमवार (दि.२) रोजी शेतकऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पेठ बीड भागात लोखंडी रॉडने तरुणावर हल्ला

बीड – शहरातील पेठ बीड परिसरात गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र समोर येत असून,पेठ बीड ठाणे प्रमुखांचा गुन्हेगारावर वचक राहिला नसल्याचे दिसत आहे. गांधी नगर भागात मंगळवारी रात्री एका तरुणावर लोखंडी रॉडने हल्ला करण्यात आला. याहल्ल्यात तरुणाच्या डोक्याला आणि हाताला गंभीरदुखापत झाली असून त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, शेख अरबाज (वय 28, रा. गांधीनगर) हा व्यवसायाने पेंटर असून त्याने शेख वसीम उर्फ राजा याच्या घराचे रंगकाम केले होते. कामाचे उर्वरित पैसे मागण्यासाठी अरबाज गेला असता वाद निर्माण झाला. या वादातून वसीम उर्फ राजा याच्यासह अन्य दोघांनी अरबाजवर लोखंडी रॉडने हल्ला केल्याचा आरोप आहे.

पान 3 वर

# सुनेत्रा पवार बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री

बीडः राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर निर्माण झालेली राजकीय आणि प्रशासकीय पोकळी भरून काढण्यासाठी राज्य सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) आमदारांच्या आग्रहाचा मान राखत सुनेत्रा पवार यांची राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदी नियुक्ती केली आहे. त्यांच्याकडे पुणे आणि बीड या दोन अत्यंत महत्त्वाच्या जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाची जबाबदारीही सोपवण्यात आली असून, ९ फेब्रुवारीपासून त्या आपल्या कामकाजाला प्रत्यक्ष सुरुवात करणार आहेत.

अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे बारामतीसह संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली होती. त्यांच्या निधनानंतर निर्माण झालेला नेतृत्वाचा प्रश्न सोडवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांनी सुनेत्रा पवार यांच्या नावाला



पसंती दिली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या नियुक्तीवर शिक्कामोर्तब केल्याने आता राज्याच्या सत्तेत सुनेत्रा पवार यांचा उदय झाला आहे. अजितदादांच्या निधनानंतर बारामती आणि बीडमध्ये पाळण्यात आलेल्या उत्स्फूर्त बंदमधून जनतेची त्यांच्याबद्दलची आत्मीयता दिसून आली होती, आता त्याच नात्याला न्याय देण्याचे आव्हान सुनेत्रा पवार यांच्यासमोर असेल.

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून अजितदादांनी अत्यंत अल्प काळात प्रशासकीय शिस्त आणि विकासाचा धडाका लावला होता. संतोष देशमुख हत्याप्रकरणानंतर धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिल्यावर दादांनी जिल्ह्याची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेतली होती. त्यांनी सुरू केलेले विकासप्रकल्प आणि जिल्ह्याचा कायापालट करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सुनेत्रा पवार याच योग्य उत्तराधिकारी असल्याचे मत पक्षाच्या आमदारांनी व्यक्त केले. त्यामुळे पुण्याच्या बालेकिल्ल्यासोबतच आता बीडच्या विकासाची जबाबदारीही त्यांच्याकडे आली आहे.

केवळ सरकारमध्येच नाही, तर पक्षातही सुनेत्रा पवार यांची पकड आता मजबूत झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी त्यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रफुल पटेल यांनी दिलेल्या माहितीनुसार, आगामी काळात त्यांच्याकडे पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुराही सोपवली जाण्याची दाट शक्यता आहे. अर्थ खाते वगळता अजितदादांकडे असलेली इतर सर्व महत्त्वाची खाती आता सुनेत्रा पवार सांभाळणार असून, त्यांच्या प्रशासकीय कौशल्याची ही मोठी कसोटी मानली जात आहे.

अजितदादांच्या कार्यशैलीचा वारसा पुढे नेण्यासाठी सुनेत्रा पवार सज्ज झाल्या आहेत. येत्या ९ फेब्रुवारी रोजी त्या मंत्रालयातील आपल्या कार्यालयातून पदभार स्वीकारतील. दादांप्रमाणेच त्या कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधून आणि प्रशासनावर पकड मिळवून लोकांचे प्रश्न मार्गी लावतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. राज्याच्या राजकारणातील या मोठ्या फेरबदलाकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# खुनातील आरोपीला ठोकल्या बेड्या; दहा तासांत खुनाचा उलगडा

### स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी; आरोपी अटकेत

बीड – शिरूर कासार तालुक्यातील रायमोहा येथे घडलेल्या तरुणाच्या निर्घृण खून प्रकरणाचा उलगडा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या दहा तासांच्या आत करून आरोपीला अटक केली आहे. चांद अल्हाहुद्दीन तांबोळी (वय 30, रा. रायमोहा) असे मृत व्यक्तीचे नाव असून तो व्यवसायाने पेंटर होता. रविवारी (दि. 1 फेब्रुवारी) सकाळी तो बीडला जातो असे सांगून स्वतःच्या मोटारसायकलवरून घरातून निघाला होता. मात्र तो



रात्रीपर्यंत परत न आल्याने कुटुंबीयांनी हरवल्याची तक्रार दाखल केली होती. सोमवारी सकाळी रायमोहा परिसरात त्याचा मृतदेह आढळून आला. डोक्यावर दगडाने मारहाण केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले असून त्यातच त्याचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन बीड स्थानिक गुन्हे शाखेने तात्काळ

पान 3 वर

## पंकजा मुंडेंच्या हेलिकॉप्टरमध्ये उड्डाणापूर्वी तांत्रिक बिघाट

### पायलटच्या सतर्कतेमुळे पंकजा मुंडे सुखरूप



छत्रपती संभाजीनगर – भाजप नेत्या व मंत्री पंकजा मुंडे यांच्या हेलिकॉप्टरमध्ये उड्डाणापूर्वीच तांत्रिक बिघाड झाल्याची माहिती समोर आली असून त्यामुळे त्यांचा लातूर दौरा तात्पुरता रखडला आहे. जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी पंकजा मुंडे या लातूरकडे रवाना होणार होत्या. मात्र टेकऑफपूर्वीच हेलिकॉप्टरच्या पायलटला तांत्रिक अडचण जाणवली. सुरक्षिततेच्या दृष्टीने उड्डाण रद्द करण्यात आले असून परिणामी त्यांच्या प्रवासाच्या तसेच सभांच्या वेळा पुढे ढकलण्यात आल्या.

पान 2 वर

# पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या प्रयत्नातून नांदुरघाट दूर क्षेत्र पोलिस चौकी झाली अद्यावत

### » तक्रारदारांना आता केज पोलिस ठाण्यात जाण्याची आवश्यकता भासणार नाही

**केज/गौतम बचुटे**

केज पोलीस ठाण्यापासून नांदूरघाट हे ३५ किमी अंतरावर आहे. तर नांदूरघाट येथे पोलीस चौकी असली तक्रारदारांना तक्रार नोंदविण्यासाठी केजला यावे लागत होते. त्यामुळे येण्या जाण्याचा खर्च आणि वेळ वाया जात होता. शेवटी पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी पुढाकार या पोलीस चौकीत तक्रार नोंदविण्याची व्यवस्था केली असून पोलीस कर्मचारी तक्रार घेऊन ठाण्यात गुन्हा नोंद करणार आहेत. त्यामुळे तक्रारदारांचा वेळ आणि खर्चाची बचत होण्यास मदत मिळणार आहे.

केज पोलीस ठाण्यांतर्गत नांदूरघाट येथे पोलीस चौकी असून ठाण्यापासून ही पोलीस चौकी ३५ किमी अंतरावर आहे. या चौकीसाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश क्षीरसागर, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक अशोक सोनवणे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक बाबासाहेब सानप, जमादार राजू वंजारे, जमादार उमेश आघाव, पोलीस अंमलदार रशीद शेख, पोलीस नाईक

पान 3 वर





"नांदुरघाट येथील पोलीस चौकीचे बांधकाम निजामकालीन आहे. याची डागडुजी करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. मात निधी प्राप्त झाल्यास अत्याधुनिक अशी ही चौकी करण्याचा मानस आहे. यामुळे गुन्हेगारीला आळा बसेल."

**स्वप्नील उनवणे**
**पोलिस निरीक्षक, केज**

# शॉर्टसर्किटमुळे आग, गेवराईत चार दुकाने खाक

### 30 लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज

गेवराई – ताकडगाव रोडवरील सोमवारी रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास ४ विविध दुकानाला आग लागून जवळपास ३० लाख रूपयांचे नुकसान झाले. अग्निशमन दलाच्या वतीने आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात आले मात्र तरीही चार दुकाने जळून खाक झाली. शॉर्ट सर्किटने आग लागली असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

गेवराई शहरातील ताकडगाव रोडवरील गेल्या सहा वर्षांपासून आशा सुंदर काळे यांचे संविधान किराणा दुकान, रेखा सुंदर काळे यांचे समाधान एम्पोरियम दुकान,

पान 3 वर



# पारधी समाजाच्या युवकांना अमानुष मारहाण प्रकरणी अखेर गुन्हा दाखल

### अ‍ॅट्रॉसिटी आणि गंभीर गुन्हा ऐवजी अदखलपात्र स्वरूपाचा किरकोळ गुन्हा दाखल

केज :– पारधी समाजाच्या दोन युवकांना अमानुषपणे गुरा ढोरा सारखी मारहाण झालेली असताना आणि मारहाण करणारा मुकादम हा सवर्ण जातीचा असताना त्यांच्यावर अट्रॉसिटी आणि गंभीर गुन्हा दाखल करण्या ऐवजी अदखलपात्र स्वरूपाचा किरकोळ गुन्हा दाखल करून अमानुष मारहाण करणाऱ्या ऊस तोड मुकादमाला अभय देण्याचा तर प्रयत्न होत नसावा ? याची चर्चा सुरू आहे.

या बाबत पारधी समाजातील तरुण राहुल विलास काळे आणि श्रावण महादेव काळे यांनी दिलेली माहिती अशी की, हे पारधी समाजातील दोन तरुण आणि त्यांची चुलती संगीता भास्कर काळे हे नागझरी तालुका केज येथील ऊसतोड मुकादम अशोक मारुती बिक्कड यांच्या कडून उचल घेऊन ते पश्चिम महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील बारामती जवळ असलेल्या सोमेश्वर सहकारी साखर कारखाना येथे ऊस तोडणीसाठी गेले होते.

दि. ३० जानेवारी, शुक्रवार



रोजी त्या दोघांना एका पिक–अप मधून अज्ञात ठिकाणी घेऊन जात सुमारे १० ते १२ लोकांनी त्यांना अमानुष व गुरा ढोरा प्रमाणे बेदम मारहाण केली. दोघांच्या पाठीवर आणि सर्वांगावर काळे निळे वळ उठलेले आहेत. तसेच डोळ्यावर मार दिल्याने त्यांच्या डोळ्याला मार लागलेला आहे. सदर घटना रात्रीची असल्याने त्यांना घटनास्थळ देखील नीट आठवत नाही. दि. ३१ जानेवारी रोजी ते राहुल काळे आणि विलास काळे हे त्यांना झालेल्या मारहाणीची माहिती देण्यासाठी त्यांच्या नातेवाईक सोबत केज येथील पोलिस ठाण्यात आले आहेत. मात्र बेदम मारहाणीमुळे घाबरलेल्या तरुणांना घटनास्थळच आठवत नसल्याने गुन्हा नोंदवून घेण्या संदर्भात तांत्रिक अडचणी येत होत्या. दरम्यान दि. २ जानेवारी रोजी संगीता काळे हिच्या तक्रारी वरून केज पोलिस ठाण्यात ऊसतोड मुकादम अशोक मारोती बिक्कड याच्या विरुद्ध दाखल केलेल्या तक्रारीत तिने म्हटले आहे की, त्यांचे व मुकादम यांचे भांडण झाल्यामुळे ते गावाकडे आले असता मुक्कामाने त्यांना केज तालुक्यातील लव्हुरी येथे अडवून चापट बुक्क्यांनी मारहाण केली. पुन्हा जर पैसे मागितले तर जीवे मारून टाकण्याची धमकी दिली. यावरून अशोक मारोती बिक्कड याच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात अदखलपात्र स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चापट बुक्क्यांनी मारहाण केली तर मग अंगावर वळ आणि डोळ्यावर सूज कशी? तक्रार दाखल करून घेताना पोलिसांनी म्हटले आहे की, मुक्कामाने त्यांना चापट बुक्क्यांनी मारहाण की. मग त्यांच्या अंगावर उठलेले वळ आणि डोळ्याला लागलेला मार कशाचा आहे ?

### अ‍ॅट्रॉसिटी नुसार गुन्हा का दखल नाही ?

पारधी समाजाच्या तरुणांना मारहाण करणारा मुकादम हा एकटाच दोघांना मारू शकणार नाही. या त्याचे साथीदार सुद्धा असू शकतात. तसेच मुकादम सवर्ण जातीचा असताना आणि अमानुष मारहाण झालेले तरुण हे पारधी समाजाचे असताना अट्रॉसिटी नुसार गुन्हा का नोंद करून घेतला नसावा याची सुद्धा चर्चा आहे.

### मुकादमाला वाचविले जातेय का ?

अशा प्रकारे किरकोळ आणि थातुर मातुर व अदखलपात्र गुन्हा दाखल करून त्या दोन तरुणांना अमानुष व बेदम.मारहाण करणारा मुकादम आणि त्याचे साथीदार यांना अट्रॉसिटी आणि जीवे मारण्याचा प्रयत्न करणे अशा गंभीर गुन्ह्यातून वाचविले तर जात नाहीना? याची कुजबुज सुरू आहे.

## खरीप सन - २०२५...पान ४ वरून

गतवर्षी ऑगस्ट आणि सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीच्या पावसाने शेतकऱ्यांचे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अतिवृष्टीच्या पावसाने शेतकऱ्यांच्या मूग, कापूस, तूर, बाजरी, ज्वारी इत्यादी पिकांचे १०० टक्के नुकसान झाले आहे. विशेष करून महाराष्ट्रात अतिवृष्टी झाल्यामुळे सोयाबिन पिकांचे उत्पादन कमी झाले आहे. यलो मोझॅक व्हायरस अनेक भागात पसरल्यामुळे सोयाबीन पिकासाठी तो घातक ठरला आहे. म्हणून सोयाबिन उत्पादन कमी झाले आहे. या सर्व गोष्टींचा शासनाने विचार करून सोयाबीन पिकासाठी १०० टक्के पिक विमा देण्यात यावा. तसेच सलग २-३ महिने अतिवृष्टी झाल्यामुळे ऊस पिकाला सूर्य प्रकाश व पुरेसा ऑक्सीजन मिळाला नाही. म्हणून ऊसाचे टनेज घटले आहे. म्हणून साखर कारखानदार यांनी केंद्र सरकारने ९.५ रिकव्हरीसाठी एफ.आर.पी. एका टनाला ३,५५०/- रूपये ठेवले आहे. तसेच ९.५ पेक्षा कमी रिकव्हरी असेल तर एफ.आर. पी. एका टनाला ३,२९०/- रूपये ठेवली आहे. म्हणून साखर कारखानदार यांनी कमीत कमी एका टनाला ३,५५०/- रूपये द्यावेत. तसेच शेतकऱ्यांच्या पुढील मागण्या मान्य कराव्या. १) खरीप २०२५ चा पिक विमा १०० टक्के द्यावा, २) महाराष्ट्रातील शेतकरी आहेत देशात सर्वाधिक कर्जबाजारी म्हणून सरकारने शेतकरी यांचे संपूर्ण सरसगट कर्ज माफ करावे., ३) पिक विम्याची सरासरी ५ वर्षांची उंबरठा उत्पादनाची मर्यादा रद्द करून ज्यावर्षी जेवढे नुकसान झाले आहे. तेवढी नुकसान भरपाई शासनाने पिक विमा कंपनीला देण्यास सांगावे., ४) स्वामीनाथन आयोग लागू करावा., ५) पंतप्रधान पिक विमा योजना रद्द करून ईर्मा कायदा लागू करावा., ६) साखर कारखानदार यांनी ऊसाला पहिली उचल ३,७५१/- रूपये द्यावी., ७) उसाला एका टनाला ५,०००/- रूपये भाव द्यावा., ८) मुख्यमंत्री महोदय म्हणतात की, काही साखर कारखाने काटे मारतात म्हणून महाराष्ट्र शासनाने सर्व कारखान्याचे काटे ऑनलाईन करावेत. महाराष्ट्रातील सर्व साखर कारखाने यांचे काटे नियमितपणे तपासून जे कारखाने काटे मारतात त्यांचे परवाने रद्द करून त्या कारखान्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत. जर शासनाने शेतकऱ्यांच्या सदर निवेदनातील मागण्या मान्य नाही केल्या तर, बीड जिल्ह्यातील शेतकरी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेत भाजप व त्यांचे मित्र पक्षांना मतदान करणार नाहीत. त्यामुळे या मागण्या पुढील आठ ते दहा दिवसांत मान्य कराव्यात अन्यथा अंबाजोगाई संभाजी ब्रिगेडच्या वतीने राज्य सरकारच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा संभाजी ब्रिगेडच्या वतीने निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदनाच्या प्रतीलिपी १) तालुका कृषी अधिकारी कार्यालय, अंबाजोगाई, २) अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय, अंबाजोगाई यांना माहितीस्तव देण्यात आल्या आहेत. सदरील निवेदनावर प्रविण उत्तमराव ठोंबरे (विभागीय सचिव-संभाजी ब्रिगेड बीड, लातूर, धाराशिव.), रामकिसन मस्के (माजी जिल्हाध्यक्ष, मराठा सेवा संघ, बीड पुर्व.), सुनंदाताई लोखंडे (जिल्हाध्यक्षा महिला आघाडी, संभाजी ब्रिगेड बीड.), नारायणराव मुळे (जिल्हा सचिव, संभाजी ब्रिगेड बीड.), प्रगतीताई जगताप (तालुकाध्यक्षा, संभाजी ब्रिगेड, अंबाजोगाई.), केशव टेहरे (जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड विद्यार्थी आघाडी, बीड), सतिष कुंडगर (जिल्हा उपाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड विद्यार्थी आघाडी, बीड), नुर शेख (तालुकाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड विद्यार्थी आघाडी.), संजय डिघोळे, अंकुशराव ढोबळे (नेते, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष), रामकृष्ण पवार गुरूजी, ॲड.प्रशांत पवार आदींसह इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## खूनातील आरोपीला....पान १ वरून

मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन बीड स्थानिक गुन्हे शाखेने तात्काळ तपासाची सूत्रे हाती घेतली. तांत्रिक माहिती व गुप्त खबर यांच्या आधारे संशयित आरोपीला बीड शहरातून ताब्यात घेण्यात आले. या खुणातील आरोपी; अतिक गुलाब तांबोळी वय -२९ रा. इस्लामपुरा बीड असे असून पैशांच्या व्यवहारातून हा वाद निर्माण होऊन खून केल्याची माहितीने आरोपीने दिली. अटक करण्यात आलेल्या आरोपीला पुढील तपासासाठी शिरूर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. अवघ्या बारा तासांत खून प्रकरणाचा छडा लावल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाचे सर्वत्र कौतुक होत आहे. ही कारवाई बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक पूजा पवार, ठाणे गुन्हे शाखा निरीक्षक शिवाजी बंटेवाड,पीएसआय खटावकर पीएसआय सुतुळे, अशोक दुबाले,राहुल शिंदे,सोमनाथ गायकवाड,मारुती कांबळे,बाळू सानप,अश्फाक सय्यद,मनोज परजने,अतुल हराळे, अलीम शेख, विकी सुरवसे व स्थानिक गुन्हे शाखेची टीम यांनी अवघ्या दहा तासात गुन्हा उघडकीस आणत खुनातील आरोपीला जेरबंद केले.

## पेठ बीड भागात....पान १ वरून

अरबाजवर लोखंडी रॉडने हल्ला केल्याचा आरोप आहे.

या मारहाणीत अरबाज गंभीर जखमी झाला असून बीड शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या घटनेपूर्वी दुपारच्या सुमारास याच भागात एका विद्यार्थ्यावर तलवारीने हल्ला झाल्याची घटना घडली होती. त्यामुळे पेठ बीड परिसरात एका दिवसात दोन हिंसक हल्ल्यांच्या घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. गेल्या काही दिवसांत जिल्ह्यात खून व हल्ल्यांच्या घटना सातत्याने घडत असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पेठ बीड परिसरात पोलिसांचा वचक कमी झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू असून, महाविद्यालय परिसर आणि गर्दीच्या भागात पोलिस गस्त वाढवण्याचीमागणी जोर धरत आहे. या प्रकरणी पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास पेठ बीड पोलीस करत आहेत.

## रत्नप्रभा कुलकर्णी यांचे निधन



अंबाजोगाई (प्रतिनिधी)- श्री खोलेश्वर प्राथमिक विद्यालयातील सेवानिवृत्त शिक्षीका सौ.रत्नप्रभा लक्ष्मीकांतराव कुलकर्णी यांचे मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

शैक्षणिक, सामाजिक कार्यात त्यांचा विशेष सहभाग होता. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अंबाजोगाई येथील बोरूळ तलाव येथील त्यांच्यावर मंगळवारी दुपारी अत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या जाण्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# नववे बौद्ध साहित्य संमेलन नागपूर येथे; स्वागताध्यक्षपदी जितेंद्र वासनिक यांची निवड



अंबाजोगाई (प्रतिनिधी)- बौद्ध साहित्य परिषदेच्या केंद्रीय कार्यकारिणीची बैठक नुकतीच नागपूर येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी बौद्ध साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे हे होते. बैठकीत आगामी नववे बौद्ध साहित्य संमेलन नागपूर येथे आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी जितेंद्र वासनिक यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

आतापर्यंत महाराष्ट्रातील विविध ठिकाणी बौद्ध (पाली) साहित्य संमेलनांचे यशस्वी आयोजन करण्यात आले आहे. यापूर्वीच्या सर्व संमेलनांच्या माध्यमातून पाली भाषा, साहित्य व संस्कृती यावर सखोल विचारविनिमय व चर्चा होत असून, त्यातून फुले-शाहू-आंबेडकर चळवळ अधिक बळकट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यापूर्वी या संमेलनाचे अध्यक्षपद ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ.ह.साळुंखे, डॉ.यशवंत मनोहर, ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे, डॉ.प्रदीप आगलावे, कथाकार योगीराज वाघमारे, प्रा.दत्ता भगत, पद्मश्री लक्ष्मण माने आणि डॉ.नरेंद्र जाधव यांनी भूषवले आहे. गतवर्षी पुणे येथे संविधान केंद्रस्थानी ठेवून या साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. अलीकडेच केंद्र शासनाकडून पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर, यंदाच्या संमेलनात पाली भाषेच्या विकासआणिअनुवादा संदर्भात साधक-बाधक बाबी तसेच भविष्यातील दिशा यावर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे, अशी माहिती बौद्ध साहित्य परिषदेचे सचिव डॉ. शंकर वाघमारे यांनी दिली. या बैठकीस मागील संमेलनाचे स्वागताध्यक्ष ॲड.सुनील सौंदरमल, प्रा.डी.जी.धाकडे, राजेंद्र सगर, पी.व्ही.जाधव, डॉ.संजय वाघ, डॉ.अशोक डोळस आदी सदस्य उपस्थित होते. यावेळी स्वागताध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर जितेंद्र वासनिक यांनी संमेलन सर्वार्थाने यशस्वी व दर्जेदार करण्याचे आश्वासन दिले. संमेलनाची तारीख व सविस्तर कार्यक्रम लवकरच जाहीर करण्यात येईल, अशी माहिती बौद्ध साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे यांनी दिली.

## पंकजा मुंडेंच्या...पान १ वरून

प्रचाराच्या निमित्ताने पंकजा मुंडे या लातूरसह सोलापूर जिल्ह्याच्या दौर्‍यावर जाणार आहेत. सोलापूर जिल्ह्यातील मंद्रूप येथे सायंकाळी ६ वाजता तर कुंभारी येथे रात्री ८ वाजता त्यांच्या प्रचार सभा आयोजित करण्यात आल्या आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे काल (२ फेब्रुवारी) पंकजा मुंडे या छत्रपती संभाजीनगर दौर्‍यावर होत्या. यावेळी वाळूज परिसरात झालेल्या प्रचार सभेत बोलताना त्यांनी, जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारादरम्यान मी हेलिकॉप्टरने प्रवास करते, त्यामुळे माझी आई देव पाण्यात ठेवते, असे वक्तव्य केले होते. त्यानंतर अवघ्या दुसऱ्याच दिवशी त्यांच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने चर्चेला उधाण आले आहे. दरम्यान, राज्यात नुकताच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या दुर्दैवी मृत्यूनंतर हवाई प्रवासाच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत असतानाच, पंकजा मुंडेंच्या हेलिकॉप्टरमधील तांत्रिक बिघाडामुळे पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. सध्या दुसरे हेलिकॉप्टर उपलब्ध होताच पंकजा मुंडे आपला निर्धारित दौरा सुरू करणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

## बीडचे बसस्थानक...पान १ वरून

असतात. बसस्थानक परिसरात सुरू असलेले गैरप्रकार रोखण्याची जबाबदारी आपली नाही, असाच त्यांचा आविर्भाव असतो. याबरोबरच ज्या ठिकाणी रात्रीच्या मुक्कामाच्या बसेस उभा असतात, त्या ठिकाणीही पुरेशी सुरक्षा नसते, यामुळे या बसेसमध्येही अनेक गैरप्रकार सुरू असतात.

**विभागीय नियंत्रकांचे नियंत्रण नाही?**

बीड बसस्थानकात गत काही काळापासून गैरप्रकार सुरु आहेत. बसस्थानकाच्या बाजुलाच विभागीय नियंत्रकांचे कार्यालय आहे, परंतु त्यांचे मात्र या सर्व प्रकारांकडे दुर्लक्ष आहे. सुरक्षा रक्षक आपले कर्तव्य बजावत नाहीत, बसस्थानकाच्या परिसरात सीसीटीव्ही कार्यरत नाहीत या बाबींवर संबंधीत अधिकारी, कर्मचार्‍यांना सूचना करणे, केलेल्या सूचनांची अंमलबजावणी होत नसेल तर कारवाई करणे अपेक्षित आहे, परंतु बीडच्या विभागीय नियंत्रकांचे या सर्व प्रकारावर नियंत्रण नाही का? असा प्रश्न वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे उपस्थित होत आहे.

**बसस्थानकात बारा सुरक्षा रक्षक नेमके काय करतात?**

बीड बसस्थानकाच्या सुरक्षेकरिता दररोज बारा सुरक्षा रक्षक खासगी एजन्सीमार्फत कार्यरत असतात, परंतु ते नेमके कोणाच्या सुरक्षेचे काम करतात, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. एजन्सीच्या मालकाचा थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क असल्याने हे गार्ड बसस्थानकातील अधिकाऱ्यांना जुमानत नसल्याची देखील चर्चा आहे.

**गस्त वाढवण्याची मागणी**

बीडचे बसस्थानक शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत आहे. या ठिकाणी दिवसभर दोन कर्मचारी नियुक्त असतात असे कागदोपत्री दिसते. परंतु प्रत्यक्षात हे कर्मचारी नेमके काय करतात, हाही संशोधनाचा विषय आहे. अनेकदा चोऱ्या, मारामाऱ्या झाल्यानंतर त्यांना फोन करून बोलवावे लागते. रात्रीच्या वेळी या ठिकाणी गस्त केली जात असल्याचेही सांगितले जाते, परंतु गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक, अवैध धंदे करणारे लोक या गस्त करणाऱ्या पोलिसांच्या नजरेत येत नसावेत असा देखील अंदाज आहे. आता हा सर्व प्रकार रोखण्यासाठी पोलिस अधीक्षकांनीच एखादे विशेष पथक नेमावे लागते की काय असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

**बसस्थानकाच्या पाठीमागील रस्ता धोकादायक!**

बीड बसस्थानकाच्या पाठीमागील रस्ता अवैध धंद्यांचे केंद्र बनला आहे. या ठिकाणी रात्री सात वाजल्यापासूनच गैरप्रकार सुरू असतात. रस्त्यावर अंधार असल्याचा गैरफायदा काही मंडळी घेतात, यावर उपाययोजना करण्याची जबाबदारी कोणाची? असा प्रश्न कायम असून शिवाजीनगर पोलिस देखील बाबाबत उदासीन आहेत.

# महांडूळा येथे स्व.अजित पवारांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण

गेवराई - राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांचे बारामती येथे विमान अपघातामध्ये निधन झाले असून त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्रात सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात खूप मोठी पोकळी निर्माण झाली असून महाराष्ट्रभर सर्वत्र शोककळा पसरली आहे. दरम्यान गेवराई तालुक्यातील महांडूळा येथे काल स्व.अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



यावेळी लहू ढोबळे, शेख मुजामील, शेख हुसेन असलम, सुनील उघडे, मच्छिंद्र ढोबळे, जब्बार भाई, खाजाभाई आलम शेख ,कांता माने , युनुस भाई, अशोक घाडगे, सोमनाथ शिंदे, अन्सार शेख, शिवनाथ घारगे, शकील शेख, हिरामण मोरे, महादेव ढोबळे, बबलू शेख कदिर महेमूद भाई , मोहन घारगे यांच्यासह विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

## वंचित बहुजन...पान ४ वरून

फेब्रुवारी रोजी बैठक संपन्न झाली ह्या बैठकीत वंचित बहुजन आघाडीच्या सिरसाळा सर्कल अध्यक्ष पदी सर्कल अध्यक्ष- माधव भिमराव किरवले , शहर अध्यक्ष -आकाश भिमराव गायकवाड ,सर्कल उपाध्यक्ष - आशोक कचरुबा फुके यांची निवड करण्यात आली आहे.ह्या निवडी वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश महासचिव किसन चव्हाण, बीड जिल्हा पूर्व अध्यक्ष शैलेश भैया कांबळे यांच्या सूचनेनुसार व बीड जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे,परळी तालुकाध्यक्ष गौतम साळवे उप.अध्यक्ष विजय झिंजुर्डे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली, पदाधिकार्‍यांच्या निवडी करुन जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांनी पक्ष संघटन व पक्ष वाढीच्या दृष्टिकोनातून मोलाचे मार्गदर्शन केले. ते म्हणाले कि,सर्वसामान्य जनतेला न्याय,हक्क मिळून देण्याकरिता व अन्याय अत्याचार विरुद्ध वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ता लढला पाहिजे, श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर व पक्षाचे विचार गाव खेड्या पर्यंत पोहोचवण्याचे कार्य आपणास करायचे आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत मोठ्या ताकतीने आपण निवडणूक मैदानात उतरणार आहेत म्हणून कार्यकर्त्यांनी सत्कार करुन शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या,दरम्यान ह्या बैठकीस अमोल किरवले,संतोष किरवले,किशोर गायकवाड,घुमरे विनोद,बाळासाहेब किरवले,किरण किरवले , वजय पाटील,राजेभाऊ सूर्यवंशी,मुन्ना गायकवाड,आकाश किरवले, रवि काजळे, अजय गायकवाड आदी सह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

## आष्टी तालुक्यातील...पान ४ वरून

बंद करावी, कर्मचाऱ्यांची निवड राज्य निधी असोशियसन मार्फत निवड करावी, इतर योजनाप्रमाणे मनरेगाची स्वतंत्र यंत्रणा तयार करून पदनिहाय आकृतिबंध तयार करण्यात यावा या मागण्यासाठी राज्यातील कमी अधिक ४३०० कर्मचाऱ्यांनी एल्गार पुकारला आहे.या राज्यव्यापी आंदोलनामध्ये आष्टी तालुक्यातील अधिकारी कर्मचारी सहभागी झाले आहेत. त्यामध्ये मनरेगा अंतर्गत कार्यरत असलेले सहाय्यक कार्यक्रम अधिकारी ३, ६ ऑपरेटर , १४ तांत्रिक सहाय्यक अधिकारी - कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

आष्टी पंचायत समिती कार्यालयात दररोज शेकडो च्या संख्येने नागरीक नरेगा कक्षात कामानिमित्त येरझारे मारत असतात दरम्यान या आंदोलनामुळे घरकुल, सिंचन विहीर, वृक्ष लागवड, फळबाग, पाणंद रस्ते आदि कामे ठप्प झाली असल्याने दररोज गजबलेला नरेगा कक्षाला टाळे लागले आहेत. गावपातळीवरील रोजगार हमीची कामे ठप्प झाली आहेत. मुंबईतील आंदोलनात लवकर तोडगा न निघाल्यास सर्व कामे बंद पडणार हे उघड आहे. यामुळे ग्रामीण भागात गावातच मिळणारा रोजगार बंद झाल्यास मजुरांची स्थिती बिकट होणार आहे.

## उपमुख्यमंत्री स्व.अजित पवार यांची सर्वपक्षीय शोकसभा

किल्लेधारूर - महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे बारामती येथे विमान दुर्घटनेत दुर्दैवी निधन झाले.या घटनेने संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरल्याचे चित्र आहे. या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्यभरात शोक व्यक्त केला जात असून, धारूर शहरात (ता.०१) रोजी सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

धारूर येथील नाट्यगृह या ठिकाणी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते या शोकसभेस विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी संघटना, पत्रकार तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी लोकनेते अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून केले.यावेळी वक्त्यांनी अजित पवार यांच्या राजकीय प्रवासावर प्रकाश टाकत, राज्याच्या विकासासाठी त्यांनी घेतलेले निर्णय, शेतकरी, युवक व सर्वसामान्य जनतेसाठी केलेले कार्य यांचा उल्लेख केला. विशेषत धारूर व परिसराच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान उपस्थितांनी आठवले. त्यांच्या स्पष्टवक्तेपणा, प्रशासनावरील पकड आणि निर्णयक्षमता यामुळे ते सर्वसामान्यांचे नेते म्हणून ओळखले जात होते, असे मत व्यक्त करण्यात आले. त्यांच्या अकाली जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणात निर्माण झालेली पोकळी भरून न निघणारी असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित नागरिकांनी दिवंगत नेत्यास दोन मिनिटं मौन बाळगून श्रद्धांजली अर्पण केली.

## युवकांनो जीवनाकडे खेळ म्हणून पाहू नका : भास्कर मगर

माजलगाव - युवकांनो जीवनाकडे खेळ म्हणून पाहू नका असे प्रतिपादन आर्ट ऑफ लिविंगचे सेलू येथील वरिष्ठ प्रशिक्षक भास्कर मगर यांनी केले. ते श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात बोलत होते.

अध्यक्षस्थानी केंद्रीय कार्यकारणी सदस्य प्रकाश दुगड हे तर अभय कोकड, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. कमलकिशोर लड्डा, सहप्रमुख प्रा.शंकर राठोड उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे यासाठी आर्ट ऑफ लिविंग आपणास जीवन जगण्याची कला शिकवते. श्री. श्री. रविशंकर यांचे विचार हे बळकट करण्यासाठी क्रीडा विभागाच्या माध्यमातून वेगवेगळ्यास्पर्धा या वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये आयोजित केल्या होत्या. फक्त विद्यार्थी चार भिंतीच्या आतमध्ये शिकत असताना तो फक्त अभ्यासातच प्रगत न होता वेगवेगळ्या कलागुणांना त्यांच्यावाव मिळावा म्हणून हे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित केले प्रास्ताविक स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. कमलकिशोर लड्डा यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर गवते, डॉ. विकास बोरगावकर यांनी तर आभार स्नेहसंमेलन सहप्रमुख प्रा.शंकर राठोड यांनी मानले.

हे पत्रक संपादक, मुद्रक, मालक व प्रकाशक अभिजीत नानासाहेब जगताप यांनी योगेश्वरी मुद्रणालय, अंबाजोगाई येथे छापून दैनिक विवेक सिंधु कार्यालय, नगर परिषद व्यापारी संकुल (संकुल क्र.४३,४४) अंबाजोगाई पिन-४३१५१७ जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले आहे. संस्थापक संपादक - प्रा.नानासाहेब गाठाळ ❊ संपादक- अभिजीत जगताप ❊ वृत्तपत्राचा नोंदणी क्र.६५७८८/८५ ❊ फोन-२४७२७०, मो :-९७६४०३३१११,९७६५५०००८८

## शॉर्ट सर्किटमुळे...

पान १ वरून

सायकल मार्ट आहे.

दरम्यान रविवारी रात्री दुकान बंद करून घरी गेल्यावर सोमवारी रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास प्रथम कानगुडे सायकल मार्ट या दुकानाला आग लागली असल्याची माहिती या भागातील एका परीसरातील व्यक्तीने सुंदर काळे यांना कळविण्यात आली. दरम्यान ते येईपर्यंत इतर आगीने रौद्ररूप धारण करून शेजारी असलेल्या इतर ३ दुकानालाही आग लागली होती. यावेळी सुंदर काळे यांनी तातडीने अग्निशमन दलाला पाचारण केले होते.

दरम्यान जवळपास दिड ते दोन तासात आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. दरम्यान या आगित या भागातील संविधान किराणा दुकानाचे १५ लाख रुपयांचे, समाधान एम्पोरियम दुकानाचे १० लाख रुपयांचे साई प्रेमचंद पार्लर २ लाख रुपये, कानगुडे सायकल मार्ट ३ लाख असे जवळपास ३० लाखांचे नुकसान झाले.

## योगेश्वरी महाविद्यालयाच्या...

पान ४ वरून

आयोजन करण्यात आले. सहली च्या नियोजनासाठी प्राचार्य डॉ.एम.व्ही. कानेटकर व उपप्राचार्य डॉ. आर. व्ही. कुलकर्णी यांचे प्रोत्साहन मिळाले. या शैक्षणिक सहलीत सुक्ष्मजीवशास्त्र विभागातील प्रा.आदित्य कदम, डॉ.तुषार करपुडे, प्रा. प्राची परमार यांनी सक्रिय सहभाग नोंदविला तसेच विभागातील कर्मचारी सुजित विडेकर यांचे सहकार्य लाभले.

पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांनी बायोसर्व्ह बायोटेक्नॉलॉजी या मॉलिक्युलर सर्व्हिसेस आणि क्लिनिकल डायग्नोस्टिक्स क्षेत्रातील एक अग्रगण्य कंपनीत अॅडव्हान्स्ड टेक्निक्स इन मॉलिक्युलर बायोलॉजी यावर प्रात्यक्षिक प्रशिक्षण पूर्ण केले. या प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांनी डीएनए विलगीकरण, अॅगरोज जेल इलेक्ट्रोफोरेसीस, पॉलिमरेज चेन रिएक्शन, सॅंगर सीक्वेन्सिंग द्वारे सूक्ष्मजीवांची ओळख पटविण्याचे तंत्रज्ञान याविषयी माहिती जाणून घेतली. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. बायोसर्व्हमधील ही कार्यशाळा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोगशाळेतील कामाचा अनुभव मिळावा आणि त्यांना मॉलिक्युलर बायोलॉजीमधील प्रगत तंत्रे, उद्योगातील मानक पद्धती आणि प्रयोगशाळेतील प्रत्यक्ष कार्यप्रवाह समजून घेता यावा, या उद्देशाने आयोजित करण्यात आली होती.

डॉ. सोहन आसरडोहकर (नॅशनल सेल्स मॅनेजर, बायोसर्व्ह) यांनी या भेटीचे नियोजन करण्यात आणि ती यशस्वी करण्यात मोलाचे सहकार्य केले. तसेच बायोसर्व्ह येथील शास्त्रज्ञ डॉ. रोझी व डॉ. संदीप यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले.

दोन दिवसांच्या या सहलीत विद्यार्थ्यांनी विविध प्रतिष्ठित महत्त्वाच्या संस्थांना भेटी दिल्या यामध्ये हैदराबाद येथील उच्चस्तरीय ही एक आधुनिक जीवविज्ञानातील संशोधनासाठी भारतातील एक अग्रगण्य आणि प्रतिष्ठित संस्था आहे. ही संस्था वैज्ञानिक तथा औद्योगिक अनुसंधान परिषदेच्या (उख्छठ) अंतर्गत कार्य करते. येथील शास्त्रज्ञ डॉ. बी. व्ही. रामकृष्ण यांनी सी. सी.एम.बी. मध्ये प्रामुख्याने जीवशास्त्राच्या मूलभूत आणि उपयोजित पैलूंवर संशोधन कार्यविषयी माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. या संस्थेने कोरोना काळात केंद्र शासनास अमूल्य अशे योगदान दिले असल्याची माहिती यावेळी दिली. तसेच नामशेष होत चाललेल्या प्राण्यांच्या प्रजातींचे जतन करण्यासाठी संस्थेमार्फत राबविल्या जाणाऱ्या वन्यजीव संवर्धन कार्यक्रमाविषयी माहिती सांगितली. तसेच संस्थेचे कृषी क्षेत्रात असलेले अमूल्य योगदान याविषयी माहिती दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना या प्रतिष्ठित संस्थेतील विविध प्रयोगशाळा पाहण्याची तसेच विविध प्रकारची अत्याधुनिक व प्रगत उपकरणे जसे की इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोपी, प्रगत उच्च- सिक्वेन्सिंग, जनुकीय संशोधनाबद्दल माहिती घेतली तसेच बायोइन्फॉर्मॅटिक्ससाठी लागणारी उच्च दर्जाची साधनसामग्री याविषयी माहिती जाणून घेण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली.

सहलीच्या शेवटच्या दिवशी विद्यार्थ्यांना बायोकॉन फार्मा (इळेल्प झहरीर) या जागतिक दर्जाच्या औषध निर्मिती कंपनीमध्ये औषध तयार करण्याची प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण आणि सुरक्षिततेचे निकष कसे पाळले जातात, याचे प्रत्यक्ष निरीक्षण करता आले. बायोकॉन येथील मॅनेजर यांनी कंपनीच्या विविध रोगावरील निर्मिती केल्या जाणाऱ्या औषध उत्पादनांची माहिती दिली. या भेटीत विद्यार्थ्यांना कंपनीमधील कार्यशैली, आवश्यक पात्रता व कौशल्य याविषयी माहिती मिळाली. विद्यार्थ्यांना बायोकॉन या कंपनी मधील विविध विभाग उदा. गुणवत्ता नियंत्रण युनिट, उत्पादन युनिट, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग व अशा प्रकारच्या फार्मा कंपनीमध्ये सुक्ष्मजीवशास्त्रज्ञांची महत्वाची भूमिका, कार्य याविषयी माहिती जाणून घेण्याची संधी मिळाली. कंपनी मधील विविध अत्याधुनिक उपकरणे व कार्य पाहण्याची संधी मिळाली. योगेश्वरी महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभातील माजी विद्यार्थी विष्णू जाधव हे बायोकॉन या नामांकित कंपनीमध्ये एक्सिक्युटिव्ही ऑफिसर व सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ या महत्वपूर्ण पदावर कार्यरत आहे. त्यांचे ही भेट आयोजित करण्यासाठी सहकार्य लाभले. त्यांनी या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना फार्मा कंपनीत सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ यांचे या कंपनीतील कार्य व प्रमुख भूमिकेविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती सांगितली. यामध्ये प्रामुख्याने औषध पूर्णपणे निर्जंतुक असल्याची खात्री करणे, औषधात सूक्ष्मजीवांची विषद्रव्ये (टॉक्सिन) आहेत का नाहीत हे तपासणे, उत्पादनामध्ये सुक्ष्मजीवांची संख्या ठरवून दिलेल्या मर्यादेत आहे का ते तपासणे, कच्चा मालातील सुक्ष्मजीवांचे प्रमाण मोजणे याविषयी माहिती सांगितली.

या शैक्षणिक सहलीमुळे विद्यार्थ्यांचा उत्साह वाढला, विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअरच्या संधी, संशोधन क्षेत्रातील नवीन आव्हाने आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील कार्यपद्धती समजून घेण्यास मदत झाली. सहभागी विद्यार्थ्यांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत हा अनुभव अत्यंत प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

## जाहिरनामा

क्रं.२०२६/संकीर्ण/जन्म-मृत्यू नोंदणी/कावि-
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई
दिनांक -०२/०२/२०२६

**जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत**
**जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस मौजे अंबाजोगाई ता.अंबाजोगाई यांना जाहिर केले जाते की, **अर्जदार सुमित्रा सुभाष जाधव, रा. काळवटी तांडा ता.अंबाजोगाई जि.बीड** यांचा जन्म दिनांक - २४/०९/२००१ रोजी त्यांचे राहते घरी मौजे काळवी तांडा ता.अंबाजोगाई जि.बीड येथे जन्म झाला असून अर्जदारांनी सदरहु कायदेशीर **जन्माची** नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदरहु अर्जदाराचे कायदेशीर **जन्माची** दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे **जन्माची** नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**आदेशावरून**
**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई**

## जाहिरनामा

क्रं.२०२६/संकीर्ण/जन्म-मृत्यू नोंदणी/कावि-
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई
दिनांक -०३/०२/२०२६

**जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत**
**जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस मौजे अंबाजोगाई ता.अंबाजोगाई यांना जाहिर केले जाते की, **अर्जदार बालासाहेब सुधाम जाधव, रा. मांडवा पठाण ता.अंबाजोगाई जि.बीड** यांचा **मुलगा नामे ऋतिक बालासाहेब जाधव यांचा** जन्म दिनांक - २३/०८/२०२४ रोजी **स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रूग्णालय अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड येथे जन्म झाला** असून अर्जदारांनी सदरहु कायदेशीर **जन्माची** नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदरहु अर्जदाराचे कायदेशीर **जन्माची** दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे **जन्माची** नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**आदेशावरून**
**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई**

## टी.सी. हरवला आहे

माझा सुमित भाऊसाहेब तरकसे, क्रांतीसिंह नानापाटील विद्यालय येल्डा ता. अंबाजोगाई जि.बीड या या विद्यालयाचा इयत्ता १० वी पासचा ओरीजनल टी.सी. येल्डा ते अंबाजोगाई या प्रवासादरम्यान हरवला आहे. तरी ज्या कोणास सापडल्यास त्यांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**मो.-९३७३४९४२२१**

## प्रा.अनिता बर्दापूरकर...

पान ४ वरून

राम कुलकर्णी , खोलेश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह किरण कोदरकर , सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक फुलारी व गौरव मूर्ती अनिता बर्दापूरकर- पोत्रेकर व रामकृष्ण पोत्रेकर यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. देशपांडे म्हणाले की, या कार्यक्रमासाठी अनिता ताईंच्या पहिल्या बॅंचचे व शेवटच्या बॅंचचे विद्यार्थी आणि आज पर्यंतचे सर्व सहकारी आवर्जून आणि मोठ्या संख्येने उपस्थित आहेत. यातूनच त्यांची विद्यार्थी घडवण्याची तळमळ व मनमिळाऊ वृत्ती समजते. नवीन आलेल्या कर्मचाऱ्यांसाठी हा सेवा गौरव नक्कीच प्रेरणादायी ठरणार आहे. सेवानिवृत्तीनंतर च्या काळात त्यांनी आपले छंद, आपल्या आवडीनिवडी जोपासण्यासाठी आपल्या वेळेचा विनियोग करावा व स्वतःसोबतच आपल्या कुटुंबाच्या आरोग्याचीही काळजी घ्यावी असे सांगून त्यांना प्रा.बर्दापूरकर यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

प्रमुख अतिथी रामभाऊ कुलकर्णी आपल्या मनोगतात म्हणाले की ,प्रा. बर्दापूरकर यांनी आईच्या मायेने विद्यार्थ्यांवर प्रेम केले त्यामुळे अनेक विद्यार्थी त्यांच्याशी जोडले गेले. माणसाने जगावं कसं याचं मूर्तीमंत उदाहरण म्हणजे प्रा.अनिताताई आहेत. शैक्षणिक कामाबरोबरच सामाजिक दायित्वही त्यांनी कधी विसरले नाही त्यामुळेच राष्ट्रसेविका समिती व परिवारातील इतर अनेक संस्था, संघटनांमध्ये त्यांनी आपले योगदान दिले. असे मत त्यांनी यावेळी व्यक्त करून प्रा. बर्दापूरकर यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

खोलेश्वर जीनियस सी.बी.एस.सी स्कूलच्या शालेय समितीचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव चौसाळकर यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, प्रा. अनिता बर्दापूरकर म्हणजे महाविद्यालयातील एक रत्न आहे. महाविद्यालयातील शैक्षणिक कामाबरोबरच आरोग्य विभागाच्या माध्यमातून रुग्णांची तपासणी व इतर तपासण्या यात योगदान देत अनेक विद्यार्थी घडवले व महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवला. असे मत व्यक्त करून त्यांनी प्रा. बर्दापूरकर यांना सेवा गौरवानिमित्त शुभेच्छा दिल्या. या सेवा गौरव समारंभात सत्काराला उत्तर देताना प्रा. अनिता बर्दापूरकर म्हणाल्या की , भारतीय शिक्षण प्रसारक संस्था ही फक्त संस्था नसून तो आमचा परिवार आहे. संस्थेने आम्हाला कसे जगायचे हे शिकवले . संस्थेने व महाविद्यालयाने आलेल्या प्रत्येक संकटात साथ दिली, मदत केली. त्यामुळे मी संस्थेच्या ऋणातून कधीही मुक्त होऊ शकत नाही असे मत व्यक्त केले.या सेवा गौरव प्रसंगी प्रा. विनय राजगुरू ,प्रा. डॉ. दिगंबर मुडेगावकर , प्रा. डॉ. रोहिणी अंकुश, प्रा. आशालता कलमे ,चि. ऋषिकेश पोत्रेकर, रामकृष्ण पोत्रेकर , रागिणी बर्दापूरकर , जयश्री इटकुरकर आदी मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली. प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दीपक फुलारी यांनी अनिताताईंनी महाविद्यालयातील विविध उपक्रमात अंतर्गत दिलेली जबाबदारी सक्षम पणे पार पाडली विशेषता आरोग्य विभाग देखील छान सांभाळला अशी भावना व्यक्त केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मोहिनी वेडे मॅडम प्रा.विनय राजगुरू यांनी केले आभार उपप्राचार्य डॉ. रवींद्र कुंबेफळकर यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, माजी विद्यार्थी व प्रा. बर्दापूरकर यांचे स्नेही मोठ्या संख्येने उपस्थित होते

## राष्ट्रीय कुष्ठरोग...

पान ४ वरून

(कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र) कालावधी दिनांक ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी या कालावधीमध्ये राबविण्यात येणार आहेत.

स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान कालावधी (दिनांक ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६) ग्रामसभे मध्ये कुष्ठरोगाबाबत जनजागृती करणे दिनांक ३० जानेवारी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त कुष्ठरोग निवारण दिन साजरा करणे व दिनांक ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी या कालावधीमध्ये विविध आरोग्य शिक्षणाचे कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत.

घोषवाक्य भेदभाव समाप्त करुया सन्मानाची वागणुक देऊया. एपवळपस उ्ळीलीळाळपरींळेप, एर्पीीळपस उ्ळसपळीं कुसुम मोहिम (कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र) कालावधी दिनांक ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी उबदेश -१. नियमित सर्व्हेक्षणामध्ये कुष्ठरोगाच्या तपासणीपासून वंचित राहीलेल्या घटकांचे सर्व्हेक्षण करणे. २. नवीन कुष्ठरुग्ण शोधून बहुविध औषधोपचाराद्वारे संसर्गाची साखळी खंडीत करुन होणारा प्रसार कमी करणे. ३. सदर घटकांमध्ये विविध प्रसार/प्रचार माध्यमाद्वारे जनजागृती करुन प्रबोधन करणे. ४. सन २०२७ पर्यंत जुन्य कुष्टरोग प्रसाराचे ध्येय साध्य करण्याच्या दिशेने वाटचाल करणे. ५. अतिजोखमीच्या ठिकाणांचे सर्व्हेक्षण करणे, मोहिमेबाबत विस्तृत प्रसिध्दी करुन जनजागृती करणे. ६. जिल्हयातील जोखमीची ठिकाणे शोधणे, मनुष्यबळाची माहिती घेवून त्यानुसार कृतीआराखडा बनविणे.

जिल्हयामध्ये एकुण २८८३६ लोकसंख्या अतिजोखमिच्या भागातील लोकसंख्या निवडण्यात आलेली आहे. यामध्ये उसतोड कामगार, खडीक्रशर कामगार, आश्रमशाळा विद्यार्थी, हॉस्टेल विद्यार्थी, तुरुंग कैदी, विटभटटी कामगार, भटकंती करणारे लोक, रोड कन्स्ट्रक्शन साईट वरिल कामगार ईत्यादी कामगारांचे आरोग्य कर्मचारी यांचेमार्फत सर्व्हेक्षण करुन कुष्ठरोग जनजागृती करण्यांत येणार आहे.

जिल्हयाची प्रगतीपर माहिती माहे डिसेंबर २०२५ अखेर माहे डिसेंबर २०२५ अखेर एकुण २१० नविन कुष्ठरुग्ण शोधण्यात आले यामध्ये (११७ पीबी व ९३ एमबी रुग्ण). उपचाराखाली १९८ रुग्ण आहेत व एकुण १७१ रुग्ण हे कुष्ठरोग मुक्त झालेले आहेत. यामध्ये २ बालरुग्ण आढळुन आले आहेत (पीबी), एकुण पात्र पीईपी सहवासीत ५३२१ असुन त्यापैकी ५२४६ सहवासितांना पीईपी देण्यात आले (९९ टक्के).

जिल्हयामध्ये आरसीएस चे ६ रुग्णांचे उददीष्ट असुन त्यापैकी २५ रुग्णांचे आरसीएस शस्त्रक्रिया वडाळा येथे करण्यात आली.कुष्ठरोग इतर आजाराप्रमाणेच पूर्णपणे बरा होणारा आजार आजाराबाबत समज-गैरसमज व कारणे कुष्ठरोग एक आजार असुन रगतपिती, महारोग, बडीबिमारी अशा कितीतरी नावाने ओळखला जातो. या आजाराकडे दुर्लक्ष केल्यावर हातापायाची बोटे झडणे, जखमा होऊन त्या दुरुस्त होत नसल्याने हातपाय थोटे होणे, डोळयाची पापणी न लागणे, डोळे आंधळे होणे, नाकाचे हाड मध्येच दबल्यामुळे नाक बसणे इत्यादीमुळे माणुस कुरुप होतो/दिसतो. जखमा ब-या होत नाहीत. यामुळे समाजात अशा व्यक्तीकडे इतर लोक, कुटुंबातील लोकासह नातेवाईक यांचेकडुन अत्यंत घृणायुक्त नजरेने पाहिले जाते. किंबहुना अशा कुरुप विकृती आलेल्या कुष्ठरुग्णांस वाळीत टाकले जाते. दुर्लक्ष केले जाते. त्यांच्याकडे कोणी आपुलकीने प्रेमाने पाहत नाहीत. त्याचे कांहीही करत नाहीत. त्यामुळे शेवटी अशा रुग्णांना मंदीरासमोर, यात्रेत बसुन भीक मागणे, गाव सोडणे यासारखया समस्यांना सामोरे जावे लागते. परंतु हे सर्व होण्याच्या अगोदर, आजार कमी असतानाच लवकरात लवकर शासनाकडील मोफत उपचार (सहा ते बारा महिने) घेऊन बरील सर्व गोष्टी टाळता येतात.

कुष्ठरोग होण्याचे कारणेः कुष्ठरोग हा इतर आजारा सारखाच उपचार घेतल्यावर पुर्णपणे बरा होणार आजार आहे. हा आजार मायकोबॅक्टरियम लेप्री नावाच्या कुष्ठजंतु जिवाणुमूळे होतो. या कुष्ठजंतुचा नोध डॉ. एच.ए. हॅनसन यांनी इ.स. १८७३ मध्ये लावला.

कुष्ठरोगाची लक्षणे काय आहेत या आजाराची लक्षणे खालीलप्रमाणे आहेत. २) कानाच्या पाळया कांहीशा जाडसर, गाठी आल्यासारख्या होतात. १) लाल पांढरट थोडासा तेलकट बधीर चट्टा प्रमुख लक्षण असुन इतर लक्षणे खालीलप्रमाणे. ३) चट्टयाच्या ठिकाणी त्वचेवर केस रहात नाहीत. चट्टयाच्या ठिकाणी किंचीत त्वचा वर उचलल्यासारखी दिसते. चट्टयावर घाम येत नाही. ४) हातापायाला मुंग्या येतात. ५) हातापायाच्या जखमा दुरुस्त होत नाहीत. ६) मज्ञतंतु (नर्व्ह) जाडसर होतात. कांहीशा दुखतातसुध्या. प्रमुख बाधा पोहंचणारे शरिराचे अवयव कोणते -१) त्वचा २) मज्ञातंतू कुष्ठरोगाचे प्रकार किती आहेत २ १) सांसर्गीक कुष्ठरोग (एमबी) ५ पेक्षाजास्त बधीर चट्टे व एक मज्ञतंतु, १ किंवा १ पेक्षा जास्त २) असांसर्गीक कुष्ठरोग (पी.बी) ५पेक्षा कमी बधीर चट्टे. कुष्ठरोगाचे प्रसाराचे माध्यम कोणते हा आजार हवेतून पसरतो. प्रमुख घटक / बाबी. १) औषधापचार न घेणारा सांसर्गीक रुग्ण (एम.बी.) २) सांसर्गीक रुग्णाचे खोकलणे व शिंगणे, यामुळे जंतू हवेत पसरतात.

३) श्वासोच्छवासातुन निरोगी व्यक्तीसच्या शरिरात जंतुचा प्रवेश ४) अत्यंत कमी रोगप्रतिकार शक्ती असलेल्या व्यक्तीत लक्षणे दिसतात. लक्षणे दिसण्यासाठी जंतूचा अधिशयन काळ-किमान ३ वर्ष व कमाल ३० वर्षापर्यंत असतो.

## धारुरच्या बाजारात...

पान ४ वरून

भाव मिळणार असल्याची अपेक्षा शेतकऱ्यांना होती. परंतू जसजसा ग्राहकांची संख्या बाजारात वाढत गेली तस-तसा भाजीपाल्याचा भाव अचानक दुपटीने खाली पडला. महिनाभरापूर्वी ५० रुपयाच्या दोन जुड्या अशी विकली जाणारी मेतीच्या भाजीची जुडी चक्क १० रुपयात दोन अशी विकावी लागली. बटाटे ३० रुपये प्रतिकिलोवरून १५ तर वांगे ५० रुपयावरून २० रुपयावर आले. फुलकोबी व पत्ताकोबी २० रुपये किलो प्रमाणे तर २५ रुपये दर असणारी कोथिंबीरची जुडी १० रुपयात मिळाली. २० रुपयांचा भोपळा १० रुपयात तर सर्वाधिक ६० रुपये किलोने विकला जाणारा टमाटा १५ रुपये किलोवर येवून पोहचले. १०० रुपयाच्या दिड किलो घ्याव्या लागणाऱ्या वटाण्याच्या शेंगा सोमवारीमात्र शंभररुपयांमध्ये तीन किलो मिळाल्या. यामुळे ग्राहकांमध्ये चांगला उत्साह दिसून आला मात्र उत्पादनासाठी केलेला खर्चही निघणार नसल्याची चिंता शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होती.

भाजीपाला फेकून दिला मागील पंधरा दिवसापासून आठवडी बाजारामध्ये भाजीपाल्याचे भाव मोठ्या प्रमाणात कमी झाले आहे .भावना वाढल्यास पिकासाठी करण्यात आलेला खर्च येईल कठीण आहे .पालेभाज्या तर शेवटी फेकून देण्याची वेळ येत आहे.

## केज नगरपंचायत मधील...

पान ४ वरून

येणाऱ्या निधीचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर झाल्याचे अहवालातून स्पष्ट झाले आहे. सदर अहवालात शासकीय निधीचा चुकीचा वापर अशा गंभीर बाबी समोर आल्या आहेत. आमच्या कार्यकाळात गरिबांना घरे उपलब्ध करून दिली.मात्र नंतरच्या काळात असे गंभीर प्रकार घडताहेत ही संतापजनक बाब आहे. या प्रकरणी आदित्य पाटील यांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, गरीबांच्या घरांसाठी असलेली योजना काही मोजक्या भ्रष्ट लोकांसाठी कमाईचे साधन बनली आहे. हा केवळ आर्थिक गैरव्यवहार नसून, गरिबांच्या हक्कांवरचा घाला आहे. अशा तीव्र संतापजनक भावना आदित्य पाटील यांनी व्यक्त केल्या आहेत.

## पोलिस निरिक्षक...

पान १ वरून

होते. त्यासाठी अनेक गावांतून वाहनांची सोय नसल्याने तक्रारकर्त्यांना भाड्याने वाहन करून यावे लागत होते. त्यामुळे वाहनांचा येण्या - जाण्याचा खर्च आणि त्याचबरोबर वेळेचा अपव्यय होत होता. शिवाय जखमींना उपचारासाठी केजच्या रुग्णालयातून अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात रेफर केले जाते. त्यामुळे जवळच्या नातेवाईकांसाठी गैरसोयीचे होत होते.

तक्रारदार यांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेत केज ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी चौकी अंतर्गत असलेल्या गावांत घडणाऱ्या गुन्हांची तक्रार चौकीत नमूद करून घ्यायची व्यवस्था केली आहे. त्यानुसार पोलीस चौकीचा अधिकारी - कर्मचाऱ्यांनी स्वतः ठाण्यात येऊन तक्रार दाराच्या फिर्यादी नुसार गुन्हा नोंदवून त्याचा एफआयआर फिर्यादी पर्यंत पोहच करण्याची जबाबदारी दिली आहे. त्यामुळे फिर्यादी तक्रारदारांना आता ठाण्या पर्यंत येण्याची गरज भासणार नाही. त्यांना चौकीत जाऊन तक्रार नोंदविता येणार आहे. त्यातून तक्रारदाराच्या वेळेसह आर्थिक बचत होण्यास मदत मिळणार आहे.

**दोन अधिकारी निवासी, जीप ही उपलब्ध**

फौजदार अशोक सोनवणे व सहाय्यक फौजदार बाबासाहेब सानप हे नांदूरघाटला निवासी आहेत. उर्वरित अधिकारी व कर्मचाऱ्यांना ठाण्यांतर्गत इतर कामे दिली जात आहेत. मात्र या दोन्ही निवासी अधिकाऱ्यांना चौकीच्या कामाची पूर्णवेळ जबाबदारी सोपविली आहे. शिवाय चौकीसाठी स्वतंत्र सरकारी जीपची व्यवस्था केली आहे.

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

## जाहीर नोटीस

महापारेषण अउदा संवसु विभाग, बीड अंतर्गत शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ नुसार शिकाऊ उमेदवार सन २०२६-२०२७ करिता विजतंत्री (Electrician) या ट्रेडमध्ये शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या करिता शिकाऊ उमेदवार यांनी भरती प्रक्रियेसाठी **www.apprenticeshipindia.org, http://apprenticeshipindia.gov.in apprenticeship/opportunity** या संकेतस्थळावर जाऊन अति उच्च दाब (संवसु) विभाग, बीड **Location No.: E11162703222** यावर ऑनलाईन अर्ज सादर करावा. ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा दिनांक **०४.०२.२०२६ (००.०१) पासून अंतिम मुदत दिनांक ११.०२.२०२६ (२३.५९) पर्यंत** राहील याची नोंद घ्यावी. सविस्तर माहितीसाठी **www.mahatransco.in** या कंपनीच्या संकेतस्थळावर भेट द्यावी. सविस्तर जाहीर नोटीससाठी उपरोक्त दर्शविलेल्या संकेतस्थळावर भेट द्यावी.

**कार्यकारी अभियंता**
**अउदा (संवसु) विभाग, बीड**

## जाहीर प्रगटन

तमाम लोकास, वित्त संस्थास, पतसंस्था, बँकास या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, जिल्हा व तुकडी बीड पोटतुकडी तालुका पंचायत समिती अंबाजोगाई पैकी शहर व कसबे अंबाजोगाई येथील जमीन सर्व्हे नं. ३७५/६ मधील प्लॉट क्रमांक १५ ज्याचा जोगाईवाडी ग्रामपंचायत घर क्रमांक १९६८ जो पुर्व पश्चिम दक्षिण बाजु १६.५ मीटर पुर्व पश्चिम उत्तर बाजु १५.२५ मीटर दक्षिण उत्तर १२ मीटर एकुण १९०.५ चौरस मीटर पुर्ण खुला प्लॉट ज्याची चतुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

**पुर्वेस - प्लॉट नं १६**
**पश्चिमेस - ६ मीटर रुंदीचा रस्ता**
**दक्षिणेस - ९ मीटर रुंदीचा रस्ता**
**उत्तरेस -अतिक अहमदची जागा**

येणेप्रमाणे वरील चतुः सिमेच्या आतील खुला प्लॉट माझे पक्षकार सनुंदा प्रकाश सातपुते यांनी यापुर्वीचे प्लॉट मालक महेश जगन्नाथ पुरी यांच्याकडुन कायम खरेदी करण्याचा व्यवहार केलेला आहे. तरी सदरील प्लॉट बाबत कोणाचेही कसल्याही प्रकारचे हितसंबंध गुंतलेले असल्यास किंवा सदर प्लॉट कोणाकडे तारण गहाण, बक्षीस किंवा इतर प्रकारचे हक्क असतील तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह माझ्या ऑफीसवर येवुन रितसर उजरदारी दाखल करावी अन्यथा मुदतीनंतर माझे पक्षकार सदर खुल्या प्लॉटचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या उजरदारीचा विचार होणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक ०३.०२.२०२६

**जाहीर प्रगटन देणार**
**स्वाक्षरीत/-**
**अॅड.अनिल संभाजीराव लोमटे**
**दामा हॉस्पीटल जवळ, बन्सीलाल नगर,**
**अंबाजोगाई जि बीड मो. नं. ९४२३४७११७९**

# दैनिक विवेक सिंधु




## राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम राबविण्यात येणार

बीड – केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शनसुचनेप्रमाणे जिल्हयामध्ये राष्ट्रीय कुष्ठ निर्मुलन कार्यक्रम राबविण्यात येतो. जिल्हांतर्गत विविध योजना राबविण्यात येतात यामध्ये स्पर्श अभियान कालावधी (दिनांक २० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६), कुसुम मोहिम

पान ३ वर

## वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकार्यांच्या निवडी जाहिर

सिरसाळा – परळी तालुक्यातील सिरसाळा सर्कल व सिरसाळा शहर च्या वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकार्यांची निवड बीड जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे व परळी तालुकाध्यक्ष गौतम साळवे यांच्या उपस्थितीत करण्यात आली, सिरसाळ्यात वंचित बहुजन आघाडीची दिनांक १

पान ३ वर

# धारुरच्या बाजारात भाज्या गडगडल्या, बटाट्यासह वांग्याच्या भावात घसरण

### भाजीपाल्यांचा भाव दुपटीने झाला कमी, शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका



धारूर – पिकाचे उत्पन्न शेतकऱ्यांच्या हातात पडेपर्यंत शाश्वती नाही अशी बनलेली वास्तविकता ही सोमवार (२ फेब्रुवारी) रोजी धारूर येथील आठवडीबाजारात पहायला मिळाली. खरिपातील नुकसान पचवून रब्बीतील पिकांना जोड म्हणून भाजीपाला पीकांमधून शेतकऱ्यांना उत्पन्नाची आस लागली आहे. त्यासाठी भाजीपाला लागवडीपासून ते काढणीपर्यंत रक्ताच पाणी करुन शेतकऱ्यांनी तळहाताच्या फोडाप्रमाणे जपलेला भाजीपाला कवडीमोल भावात विकावा लागत असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाल्याचे विदारक चित्र सोमवारी धारूरच्या आठवडी बाजारात पाहायला मिळाले.

सोमवार (२ फेब्रुवारी) रोजी नेहमीप्रमाणे आठवडी बाजार भरला बाजारात भाजीपाला विक्रेते आणि उत्पादक शेतकऱ्यांनी दुकाने थाटली होती. सोमवार आणि शुक्रवार असे दोन दिवस भरणारा धारूरचा आठवडी बाजारात महिन्याभरापूर्वीचा अंदाज विचारात घेता चांगला

पान ३ वर

# खरीप सन - २०२५ चा पिक विमा द्या

### संभाजी ब्रिगेडची मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी



अंबाजोगाई (प्रतिनिधी)– गतवर्षी ऑगस्ट आणि सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीच्या पावसाने शेतकऱ्यांचे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. गतवर्षी अतिवृष्टीच्या पावसाने शेतकऱ्यांच्या मूग, कापूस, तूर, बाजरी, ज्वारी इत्यादी या पिकांचे १०० टक्के नुकसान झाले आहे. विशेष करून महाराष्ट्रात अतिवृष्टी झाल्यामुळे सोयाबीन या पिकाचे उत्पादन कमी झाले आहे. यलो मोझॅक व्हायरस अनेक भागात पसरल्यामुळे सोयाबीन पिकासाठी तो घातक ठरला आहे. म्हणून सोयाबीन उत्पादन कमी झाले आहे. या सर्व गोष्टींचा शासनाने विचार करून सोयाबीन पिकासाठी १०० टक्के पिक विमा देण्यात यावा. अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने राज्याच्या मुख्यमंत्र्यांना सोमवारी उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांच्या मार्फत देण्यात आलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

संभाजी ब्रिगेडच्या वतीने राज्याच्या सन्माननीय मुख्यमंत्र्यांना सोमवार, दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांच्या मार्फत देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,

पान ३ वर

# बीडचे बसस्थानक बनले अवैध धंद्यांचा अड्डा

### प्रवाशांची सुरक्षा धोक्यात; तृतीयपंथीयांकडून एकाला मारहाण

बीड – बीड बसस्थानकाची नूतन इमारत सुंदर आणि आकर्षक बांधण्यात आली असली तरी त्या परिसरात गेल्या काही दिवसांत अत्यंत किळसवाणे प्रकार सुरू आहेत. सर्वसामान्य प्रवाशांची सुरक्षा मात्र यामुळे धोक्यात आली असून एसटीचे अधिकारी, कंत्राटी सुरक्षा कर्मचारी आणि या ठिकाणी नियुक्त पोलिस कर्मचारी सर्वजण एकमेकांवर खापर फोडण्यात धन्यता मानत आहेत.

यावर ठोस उपाययोजना आणि त्या विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनीच करण्याची मागणी जोर धरत आहे. रविवारी रात्री या ठिकाणी दोन तृतीयपंथीयांनी एका व्यक्तीला मारहाण केल्याचा प्रकार घडला असून या प्रकरणात अद्याप कोणीही तक्रार दिलेली नाही. सोलापूर–धुळे महामार्गावर बीडचे बसस्थानक हे मध्यवर्ती ठिकाणी आहे, यामुळे या ठिकाणी दररोज शेकडो बस आणि हजारो प्रवासी ये–जा करत असतात. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन काही दिवसांपूर्वीच सुसज्ज अशी इमारत उभारण्यात आलेली आहे.

इमारत उभारल्यानंतर या ठिकाणी प्रवाशांना चांगल्या सुविधा आणि मिळेल असे अपेक्षित होते. परंतु या ठिकाणी स्वच्छतेचा बोजवारा उडालेला असताना आता प्रवाशांच्या सुरक्षेचादेखील प्रश्न निर्माण झाला आहे. बीड बसस्थानकात रात्री उशिरापर्यंत बसेस येत असतात, त्यामुळे प्रवाशांची चढ–उतार सुरू असते. परंतु रात्री दहा वाजेनंतर या ठिकाणी मद्यपान करून आलेले लोक धिंगाणा घालतात, याबरोबरच वेश्या व्यवसाय करणाऱ्या काही महिलांचाही वावर या ठिकाणी असल्याचे समोर आले आहे.

याबरोबरच तृतीयपंथीयदेखील या ठिकाणी थांबलेले असतात. अनेकदा या लोकांमध्ये बाद होतात, मारामारी होते, यामुळे सर्वसामान्य प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. गंभीर बाब म्हणजे या ठिकाणी कार्यरत असलेले सुरक्षा रक्षक एकाच विकाणी बसून आपले 'कर्तव्य' बजावत

पान २ वर

# केज नगरपंचायत मधील प्रधानमंत्री आवास योजनेतील घोटाळा प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करा

### माजी नगराध्यक्ष आदित्य पाटील यांची मागणी



केज – केज नगरपंचायत मधील पंतप्रधान आवास योजना (शहरी)' अंतर्गत ३ कोटी ६० लाख रुपयांचा महाघोटाळा झाल्याचा गंभीर प्रकार चौकशी समिती कडून उघड झाला आहे. या गैरव्यवहार प्रकरणातील अधिकारी पदाधिकारी यांसह सर्व दोषींवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी अशी मागणी केज नगरपंचायतचे माजी नगराध्यक्ष आदित्य पाटील यांनी केली आहे.

गोरगरिबांचे घरे गिळंकृत केली गेली. या प्रकरणावर आदित्य पाटील यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. या प्रकरणातील दोषी अधिकारी व पदाधिकाऱ्यांचे तात्काळ निलंबन करून अपहार झालेली पूर्ण रक्कन लाभार्थ्यांना मिळावी.दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर शिक्षा करावी अशी मागणी केज नगरपंचायतचे माजी नगराध्यक्ष आदित्य पाटील यांनी केली आहे. पंतप्रधान आवास योजनेतून गोरगरिबांना टप्प्याटप्प्याने आर्थिक सहाय्य देण्यात येते. मात्र केज नगरपंचायतीमध्ये हा निधी लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याऐवजी बनावट नोंदी, खोटी कागदपत्रे आणि संगणकीय हेराफेरी करून शेकडो पात्र लाभार्थ्यांना अद्याप संपूर्ण रक्कम मिळालेली नसताना निधी मात्र पूर्णपणे उचलल्याचे उघड झाले प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत गरीब व गरजू नागरिकांसाठी देण्यात

पान ३ वर

# प्रा.अनिता बर्दापूरकर यांनी कर्तव्य, त्याग आणि सेवा यांचा आदर्श वस्तुपाठ घालून दिला : देशपांडे




अंबाजोगाई – प्रा. अनिता बर्दापूरकर यांनी गेली ३४ वर्ष खोलेश्वर महाविद्यालयात अत्यंत तत्परतेने आणि उत्तमतेने आपली सेवा दिली. २०१७ नंतर तर त्यांचे सहकारी डॉ. धर्मराव यांच्या सेवानिवृत्तीनंतर संपूर्ण विभागाची धुराच प्रा. बर्दापूरकर यांनी समर्थपणे सांभाळली आणि याबरोबरच गुणवत्तेतही तडजोड कधी केली नाही. त्यांनी आपल्या कर्तव्य, त्याग व सेवा यातून नवीन पिढीला चांगले पायंडे घालून देऊन आदर्शांचा वस्तू पाठच घालून दिला आहे. त्यामुळे संस्थेमध्ये नवीन आलेल्या लोकांनी या जुन्या लोकांच्या पदचिंन्हावर चालले पाहिजे असे प्रतिपादन खोलेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष तथा नगरसेवक डॉ. अतुल देशपांडे यांनी केले.

ते खोलेश्वर महाविद्यालयातील प्रा. अनिता बर्दापूरकर यांच्या सेवा गौरव समारंभात अध्यक्ष स्थानावरून बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष

पान ३ वर

# योगेश्वरी महाविद्यालयाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागाची हैदराबाद येथे शैक्षणिक सहल



अंबाजोगाई – येथील योगेश्वरी महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि संशोधक वृत्तीला चालना देण्यासाठी हैदराबाद, तेलंगाणा येथील नामवंत औद्योगिक आणि संशोधन संस्थांना भेट देण्यासाठी दिनांक २७ व २८ जानेवारी रोजी दोन दिवसीय शैक्षणिक सहलीचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

या सहलीमध्ये सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील एकूण २१ विद्यार्थी व ४ प्राध्यापक सहभागी झाले होते. पुस्तकी ज्ञानाला प्रात्यक्षिकांची जोड मिळावी आणि जागतिक दर्जाच्या कंपन्यांमधील कामकाजाचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळावा, या मुख्य उद्देशाने योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. चंद्रशेखर बर्दापुरकर यांच्या प्रेरणेने व सहसचिव भीमाशंकर शेटे व योगेश्वरी शिक्षण संस्थेचे जेष्ठ सल्लागार व महाविद्यालयाचे प्रभारी प्रा. एन. के. गोळेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली या सहलीचे यशस्वी आयोजन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर यांनी शैक्षणिक सहली, औद्योगिक संस्थाना भेटी व अभ्यास दौरे असे उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वारंवार आयोजित करावेत असे नुकतेच आवाहन केले होते त्या पार्श्वभुमीवर सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अनिल नरसिंगे यांच्या नेतृत्वाखाली या सहलीचे यशस्वी

पान ३ वर

# धारूरचा घाटात अपघातचे प्रमाणे वाढले

### घाटाचे रुंदीकरण कधी होणार?

किल्ले धारूर –धारूर चा घाट बनतोय मरणाची वाट, दररोज अपघाताची संख्या वाढत आहे रुंदीकरण कधी होणार असा प्रश्न सामान्य नागरिकांना विचारू लागले आहेत रुंदीकरण न झाल्यामुळे दिवसेंदिवस अपघाताची संख्या वाढत आहे अरुंद रस्ता हाच अपघातासाठी कारणीभूत आहे.

धारूरचा घाटा अरुंद असल्याने चढण्यासाठी अवघड आहे यामुळे दररोज अपघाताची मालिका सुरूच आहे. हा घाट बिकट मरणाची वाट झालेला दिसून येत आहे या घाटातून अनेक वाहने ये जा करतात ऊस वाहतूक करणारे वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणामध्ये झाली आहे. चढण्यासाठी अवघड असल्याने कधीही अवजड वाहन पाठीमागे येईल आणि मागील वाहनाच्या अंगावर जाईल हे सांगता येत नाही यातून अपघात वाढत आहेत.

हे ऊस चालक दगडाची उटी लावत आहेत पुढे गेला तरीही ती काढली जात नाही यातून मोटरसायकलचे देखील मोठ्या प्रमाणावर अपघात घडत आहे धारूरच्या घाटामध्ये अनेक अपघात होऊन गाड्या दरीत कोसळल्या आहेत यातून वित्तहानी व जीवित हानी मोठ्या प्रमाणावर झाली आहे तरीदेखील लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे या घाटाकडे दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे केवळ या घाटाचे रुंदीकरण होणार एवढ्याच बातम्या ऐकाव्यात मिळत आहेत परंतु प्रत्यक्षात मात्र घाटाबद्दलची कारवाई झालेली दिसून येत नाही हा आनंद घाटच अपघातात कारणीभूत असल्याचे वाहनचालक सांगत आहेत या घाटाचे रुंदीकरण लवकरात लवकर करावे अशी मागणी मोठ्या प्रमाणावर नागरिक तसेच वाहनचालक करत आहेत.

# आष्टी तालुक्यातील 'रोहयो'ची कामे ठप्प

### राज्यव्यापी संपात आष्टीचे कर्मचारीही आझाद मैदानावर



आष्टी – एकच मिशन, शासन सेवेत समायोजन' या प्रमुख मागणीसाठी व इतर विविध मागण्यांसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) कार्यरत असलेल्या हजारो कंत्राटी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी मुंबईतील आझाद मैदानावर राज्यव्यापी आंदोलन पुकारले आहे.या राज्यव्यापी आंदोलनामध्ये काळ्या फिती लावून निषेध नोंदवत मनरेगातील आष्टी तालुक्यातील २३ अधिकारी कर्मचारी सहभागी झाले आहेत.यामुळे तालुक्यातील मनरेगा ची कामे विस्कळीत होऊन ठप्प झाली आहेत.

राज्यातील मनरेगांतर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी वर्षानुवर्षे आंदोलन करुन प्रलंबित असलेल्या मागण्यांकडे सातत्याने लक्ष वेधूनही शासनाकडून साफ दुर्लक्ष करण्यात येत आहे. त्यामुळे मनरेगांतर्गत कार्यरत असलेल्याअधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी २ फेब्रुवारी पासून राज्यव्यापी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.यामुळे मनरेगा ची राज्यातील कामे विस्कळीत झाली. मनरेगा अंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी, कर्मचाऱ्यांना इतर योजनेतील कर्मचाऱ्या प्रमाणे शासन सेवेत कायम वा समायोजित करावे, एस२ इन्फॉटेक मार्फत होणारी अनधिकृत व अवैध कर्मचारी भरती

पान २ वर


ROYAL ENFIELD
ROYALENFILD.COM



Build on a 124- year old legacy-
Be a part of our team

Royal Enfield,the world's oldest motorcyling company in continuous production, is looking for :

**SALE**
सेल्समन – २ पुरूष/महिला

**SERVICE**
स्पेयर पार्ट मॅनेजर – २ पुरूष/महिला
कस्टमर रिलेशन एक्झिक्युटिव (टेलिकॉलर)४ महिला
टेक्निशियन – ४ पुरूष

**NON KEY ROLES**
मदतगार (हेल्पर) – २ पुरूष
बँक ऑफीस –२ पुरूष/महिला

तुम्ही तुमचा रिझ्युम,फोटो व पोस्टचा उल्लेख करून खालील ई–मेल आयडी व Whas't App वर पाठवा.
royalbhoomimotorsambajogai@gmail.com

✻ मुलाखत ✻

स्थळ:– भूमी मोटार्स,विमल सृष्टी जवळ,केज रोड,अंबाजोगाई ता.अंबाजोगाई जि.बीड–४३१५१७
Mob - 9145004560